**<u>नियमित दिवाणी दावा क्र.६३/२०१८</u>**

**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००३३०-२०१८**

**<u>निशाणी क्र. १ वरील आदेश</u>**

अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणी दि.०१/१०/२०२४ रोजी नि.क्र.८९ येथे मुद्दे काढण्यात आले आहेत. वादी यांनी आपल्या तर्फे मुखत्यार चंद्रशेखर श्रीशंकर मोंडकर यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.९० येथे दि.२०/०२/२०२५ रोजी दाखल केले आहे. तेव्हा पासून प्रस्तुत प्रकरण हे वादी यांच्या उलटतपासा करिता नेमलेले आहे.

अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मागील बऱ्याच तारखांपासून वादी न्यायालयात हजर नाहीत. आज देखील वादी न्यायालयात अनुपस्थित असल्याचे दिसून येते. तसेच वादी तर्फे कोणताही अर्ज अभिलेखावर दाखल केलेला नाही. वादी यांनी जरी अभिलेखावर आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असले तरी त्यांचा उलटतपास झाल्या शिवाय त्यांच्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रास काही किंमत नाही. परंतु वादी यांचे वर्तणुक पाहता, वादी हे विनाकारण उलटतपासा करिता अनुपस्थित राहत असल्याचे दिसून येते. तरी वादी यांनी पुढील तारखेस उलटतपासा करिता न्यायालयात हजर रहावे. अन्यथा प्रस्तुत प्रकरण खारीज करण्या बाबत आदेश पारित करणेत येईल याची वादी यांनी नोंद घ्यावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.11.06 15:56:43 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )

दि.०६/११/२०२५ — दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड